स्वच्छ गांव ! निर्मल ग्राम !! सुंदर गांव !!!



# गट ग्राम पंचायत वेळा (हरिश्चंद्र)



## पंचायत समिती नागपूर, ता.जि. नागपुर.

| सरपंच | उपसरपंच | सचिव |
|---|---|---|
| श्री. सचिन कृष्णराव इंगळे | श्री. प्रभाकर बापुराव काळबांडे | श्री. सी.पि. मुंगले |

**सदस्य गण**

श्री. आकाश ज्ञानेश्वर पिसार

सौ. सोनाली सतिश सेलकर

सौ. कविता पिंटु ठाकरे

सौ. शालिनी राजू थुल

सौ. माधुरी पुरुषोत्तम बोधनकर

सौ. प्रियंका छत्रपाल पाटील

जा. क्र. ग्रा. पं. वेळा (हरिश्चंद्र) आ./जा. २०
दिनांक दि. १३/५/२०२१
पं.स.त.जि. नागपूर

प्रती,

मा. कार्यकारी अभियंता (मेट्रो)
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
सदर रोड, नागपूर

विषय : मौजा वेळा (हरिश्चंद्र) ख.क्र. 14/4 (पार्ट),14/5 या लेआउट मध्ये आपले सोबत केलेल्या करारनाम्याप्रमाणे हस्तांतरण करण्याकरिता अभिप्राय सादर करणेबाबत.

संदर्भ: दि. 03/04/2021 रोजीचा मेसर्स महालक्ष्मी रियल्टिज तर्फे राहुल जगदीश बोंदरे व इतर यांचा लेआऊट हस्तांतरण करण्याबाबत अर्ज.

महोदय,

उपरोक्त संदर्भिकृत विषयाच्या अनुषंगाने सविनय कळविण्यात येते की मौजा वेळा (हरिश्चंद्र) ख.क्र. 14/4 (पार्ट),14/5 येथील लेआउट नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मध्ये मान्य करून विकसित केल्याचे संदर्भीय पत्रात नमूद आहे. व यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने आपले कार्यालयाचे पत्र क्र. E.E(NMRDA)/DPC/AGREE/357 दि. 29/12/2020 नुसार केलेल्या करारनामाची प्रत सुद्धा सादर केलेली आहे. व यांनी सादर केलेल्या ले आऊट अभिन्यासानुसार सदर ले आऊट मध्ये एकूण 46 प्लॉट आखण्यात आल्याचे दिसून येते. एकूण प्लॉटपैकी प्लॉट नं. 1 व 46 हे 350 चौ. मी. चे वर असल्याचे दिसून येत आहेत. व या प्लॉटवर भविष्यामध्ये अपार्टमेंट स्कीम अस्तीत्वात येतील हे नाकारता येत नाही.

या सर्व बाबीचा विचार करता आज रोजी प्लॉट नं. 1 व 46 या प्लॉटमध्येच कमीतकमी 12 फॅमिली वास्तव्य करेल असा अंदाज आहे व शिल्लक असलेले 44 प्लॉटवर बाकी फॅमिली सुद्धा वास्तव्य करेल.

वरील सर्व बाबीचा विचार केला असता या ले आऊट मध्ये सिवरेज लाईन तथा करारनामाप्रमाणे इतरत्र विकसित कामे सदरहू गरजेला अनुसरून केले किंवा नाही याबाबत आपला अभिप्राय या कार्यालयास उपलब्ध झाल्यास अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे सदरहू ले आऊट भविष्यातील दुरूस्तीकरिता या कार्यालयास हस्तांतरण करण्यास अवघड जाणार नाहीत.

करिता आपला अभिप्राय या कार्यालयास लवकरात लवकर प्राप्त होईल या अनुषंगाने आपले कार्यवाहीसाठी सादर.

सहपत्र:

1) मेसर्स महालक्ष्मी रियल्टिज तर्फे राहुल जगदीश बोंदरे व इतर यांचा अर्ज सत्यप्रत
2) जिल्हाधिकारी यांचा अकृषक परवाना सत्यप्रत
3) ले आऊट नकाशा सत्यप्रत
4) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा करारनामा सत्यप्रत

प्रतिलिपी:

1) मा. सहायक अभियंता (दक्षिण) एन.एम.आर.डी.ए हनुमान नगर झोन, नागपूर
2) मा. गट विकास अधिकारी पंचायत समिती नागपूर यांना माहितीस सादर.
3) मेसर्स महालक्ष्मी रियल्टिज तर्फे राहुल जगदीश बोंदरे व इतर यांना माहितीस सादर.

सरपंच सचिव
गट ग्राम पंचायत वेळा (हरिश्चंद्र)